महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२
Website :www.doa.maharashtra.gov.in Email:dirdoa.mum-mah@gov.in/ directorateofart@gmail.com/higherartexam@gmail.com

क्रमांक- डिओऐ/२०२४/चार/१०४० दिनांक :- ०५.०४.२०२४

वाचावे : १) कला संचालनालयाचे परिपत्रक क्र.डिओऐ/२०२४/चार/६१५, दिनांक २८.०२.२०२४
२) कला संचालनालयाचे परिपत्रक क्र.डिओऐ/२०२४/चार/६६७, दिनांक ०४.०३.२०२४
३) कला संचालनयाचे परिपत्रक क्र. डिओऐ/२०२४/चार/७२०, दिनांक ११.०३.२०२४

## परिपत्रक

शासकीय उच्चकला परीक्षा २०२४ करिता कला संस्थांची ऑनलाईन नोंदणी, परीक्षेस प्रविष्ठ होण्यास पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांचे कला संस्थेमार्फत परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने विहित कालावधीत सादर करण्याबाबत तसेच परीक्षेच्या अनुषंगाने इतर आवश्यक सूचना संदर्भिय क्र. १, २ व ३ वरील परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच, दिनांक २०.०३.२०२४ रोजी उच्चकला परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आले असून सदर वेळापत्रक उच्चकला परीक्षा लिंकच्या होमपेजवर उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

त्यास अनुसरुन कळविण्यात येते की, परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क विहित कालावधीत ऑनलाईन सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमनिहाय आसन क्रमांक (Roll No.) तसेच परीक्षा प्रवेश पत्र (Hall Ticket) कला संस्थांचे अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉग इनवर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्यानुसार, अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सदर आसन क्रमांक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच, परीक्षा प्रवेश पत्रावरील विद्यार्थ्याचे नाव, अभ्यासक्रम, आसन क्रमांक इ. माहिती अचूक असल्याची खात्री केल्यानंतर अधिष्ठाता/प्राचार्य यांनी प्रवेश पत्रावर शिक्यानिशी स्वाक्षरी करुन संबंधित विद्यार्थ्यांना प्रवेश पत्र वितरीत करावे.

संदर्भिय क्र. २ येथील परिपत्रकान्वये शासकीय उच्चकला परीक्षा २०२४ चे आयोजन केंद्र स्तरावर न करता गतवर्षीप्रमाणे **कला संस्था स्तरावर** करण्यात येणार असल्याबाबत तसेच सदर परीक्षेचे आयोजन अभ्यासक्रमानुसार मौखिक, सैध्दांतिक व प्रात्यक्षिक स्वरुपात करण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे. त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

- **मौखिक** विषयांच्या परीक्षा कला संस्थेचे अधिष्ठाता/प्राचार्य व एक ज्येष्ठ अध्यापक अथवा वर्गशिक्षक यांचेमार्फत संस्था स्तरावर वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात याव्यात व त्यानुसार विद्यार्थ्यांचे मौखिक विषयांचे उचित मुल्यांकन करावे. त्याकरिता आवश्यक असलेले अभ्यासक्रमनिहाय गुणतक्ते परीक्षा लिंकच्या होमपेज उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
- **सैध्दांतिक व प्रात्यक्षिक** विषयांच्या प्रश्नपत्रिका कला संस्थांचे अधिष्ठाता / प्राचार्य यांच्या लॉग इनवर ऑनलाईन पध्दतीने संबंधित विषयाच्या परीक्षेच्या १ दिवस अगोदर सकाळी १०.०० वाजता उपलब्ध करुन देण्यात येतील. अधिष्ठाता/प्राचार्य यांनी प्राप् झालेल्या प्रश्नपत्रिकांच्या प्रत्यक्ष परीक्षेच्या १ दिवस अगोदर विद्यार्थी संख्येनुसार प्रिंट आऊट काढून आपल्या अभिरक्षेत ठेवाव्यात व गोपनियतेचा भंग होणार नाही, याबाबतची विशेष दक्षता घेऊन वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा सुरळीतपणे पार पाडाव्यात.
- कला संस्थांना सैध्दांतिक विषयांसाठी लागणाऱ्या मुख्य व पुरवणी उत्तरपत्रिका कला संचालनालयाकडून पोस्टाद्वारे यापूर्वीच पाठविण्यात आल्या आहेत.

Scanned with OKEN Scanner

शासकीय उच्चकला परीक्षा वेळापत्रकाप्रमाणे व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी कला संस्थांनी परीक्षा केंद्रावर कंडक्टर, सुपरवायझर, लिपिक, शिपाई इ. आवश्यक कर्मचारी वर्ग नेमावा व त्याबाबत या कार्यालयास अवगत करावे. नियुक्त कर्मचाऱ्यांनी परीक्षे दरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घेऊन आपली कर्तव्ये पार पाडावीत.

संदर्भिय क्र. २ वरील परिपत्रकात नमूद केलेल्या सुचनांच्या अनुषंगाने विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन अभ्यासक्रमानुसार परीक्षेसाठी लागणारे आवश्यक साहित्य खरेदी करण्याकरिता अभ्यासक्रमनिहाय साहित्याच्या याद्या परीक्षा लिंकच्या होमपेजवर यापूर्वीच उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्यानुसार अधिष्ठाता/प्राचार्य यांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

इंटरमिजिएट व डिप्लोमा स्कल्प्चर ॲन्ड मॉडलिंग या अभ्यासक्रमाच्या परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक विषयांच्या परीक्षेचे आसन क्रमांकानुसार दैनंदिन व्हिडीओ शुटींग करण्यात यावे व सदर व्हिडीओ शुटींग पेन ड्राईव्ह अथवा कॉम्पॅक्ट डिस्क (CD) मध्ये जतन करुन संबंधित कला संस्थेचे अधिष्ठाता/प्राचार्य यांनी आपल्या अभिरक्षेत ठेवावे. मुल्यमापन केंद्राबाबत कळविण्यात आल्यानंतर सदर पेन ड्राईव्ह अथवा कॉम्पॅक्ट डिस्क (CD) उत्तरपत्रिकांच्या गठ्ठयांसह जमा करावेत.

परीक्षेच्या अनुषंगाने आवश्यक असणारे A, B व C फॉर्म्स, कंडक्टर व सुपरवायझर रिपोर्टचे नमुने, विद्यार्थ्यांचे दैनंदिन उपस्थितीपत्रक इ. उच्चकला परीक्षा लिंकच्या होमपेजरवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर परिपत्रक https://doaonline.in/nameandmarksentry या उच्चकला परीक्षेच्या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच, यापुढे या कार्यालयाकडून निर्गमित करण्यात येणारी परिपत्रके/पत्रे तसेच परीक्षा विषयक इतर माहिती सदर लिंकवर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यामुळे, सदर लिंकवरील माहितीचे संबंधितांनी वेळोवेळी अवलोकन करावे.

(नागेश वाघमोडे)
परीक्षा नियंत्रक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रति,

१) अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.
४) प्राचार्य, शासनमान्य अशासकीय कला संस्था. (सर्व)

प्रत: माहितीस्त सादर.

१) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक दोन, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.
३) उपसचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई/नागपूर/छत्रपती संभाजीनगर विभाग.
४) निवड नस्ती.

Scanned with OKEN Scanner